International Multilingual Research Journal

Printing Area™

ISSN 2394-5303

Special Issue, March-2018



# Greatest Philosopher : Dr.Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
**प्रा. नागसेन नामदेव मेश्राम, अहेरी** || 148

45) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री
**प्रा. डॉ. धिरजकुमार ल. नजान, जि. अकोला** || 151

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय जाती व्यवस्था
**डॉ. नलिनी बोरकर, जि. भंडारा** || 154

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाबाबत विचार
**प्रा. नंदकीशोर उकंडराव राऊत, जि. अमरावती.** || 159

48) दलित रंगभूमी आणि मराठवाडा (विशेष संदर्भ डॉ. बाबासाहेब आंबेडकर)
**प्रा. नरेंद्रकुमार शिवाजीराव कदम, जि. यवतमाळ** || 163

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिवर्तनवादी लोकपत्रकारिता
**प्रा. नरेश दे. आंबिलकर, जि. नागपूर** || 165

50) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही – एक आकलन
**प्रा. डॉ. नितीन तुळशिराम कत्रोजवार, जि. चंद्रपूर** || 168

51) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बौद्ध धर्म
**प्रा. प्रदिप लक्ष्मणराव अंबोरे, अमरावती** || 172

52) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यता निर्मूलन : एक समाजशास्त्रीय अभ्यास
**प्रा. अनिल गाडेकर, उमरगा** || 174

53) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाविषयक विचार
**प्रा. अनुप अरुण नांदगावकर, जि. वाशिम** || 176

54) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरणाबाबतचे योगदान
**प्रा. बबीता मनिष थुल, नागपूर** || 179

55) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मानवतावाद
**प्रा.डॉ. भारती कृ. सातपैसे, नागभिड** || 184

56) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक चळवळ – एक दृष्टीक्षेप
**प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे, जि. पुणे** || 188

57) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयी भुमिका
**डॉ. प्रज्ञा भिमराव गुरदे (जमधाडे), यवतमाळ** || 191

58) **डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्व व जन मानसाला मिळालेली प्रेरणा**
दिनेश जारोंडे, जि. यवतमाळ, महाराष्ट्र || 194

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

राष्ट्रवाद धर्म लोकशाही अश्या सर्व विषयावर चिंतन आहे. त्यांचा विचारांचा केंद्रबिंदु मानव आणि मानवच आहे. ईश्चरांसारचया पारलौकिक गोष्टी नाही. या देशातील कोटयाचधी जनतेच्या अंत:करणाला हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आंबेडकरांच्या वाणीला आणि लेखणाला प्राप्त झालेले आहे. ते त्यामागे असणाऱ्या दिव्य मानवतावादी वलयामुळेच होय.

भारतीय समाजावर दुरगामी परिणाम साधणारे अनेक शक्तीप्रवाह आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांनी केले. आपल्या विचारामधुन त्यांनी पददलितांच्या अंगी नवा स्वावलंबन, पुढाकार वृत्ती, व्यक्तिगत सचोटी व सामाजिक जबाबदारी अश्या गुणांचे संगोपण केले होते.

मानवी मूल्यांच्या आधारावर सामाजिक जबाबदारी पेलणे, सबंधाची बांधणी करणे हे त्यांचे ध्येय होते. शतकानुशतके मानवी अधिकार ज्यांना नाकारण्यात आला आहे ते त्यांना मिळवून दिल्याशिवाय ते राष्ट्राच्या जीवनात एकरूप होणार नाही याची जाणीव प्रथमत: आंबेडकरांना झाली. राष्ट्रीय ऐक्याचा मार्गात अडथळ आणणारया भाषावाद, प्रांतवाद, फुटिरतावाद, जातियता या विरूध्द त्यांनी युध्द पुकारले. अश्पुश्यांना त्यांचा उध्दारासाठी शिक्षण, संघटन आणि संघर्ष असा त्रिसुत्री कार्यक्रम त्यांनी सांगितला म्हणुनच भारतात एका नव्या युगाची सुरूवात करणारा युगपुरूष म्हणुन आधुनिक विचारवंतात मानवतावादी विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान महत्वपुर्ण व श्रेष्ट माणले जाते.

**सदर्भ ग्रथ सूची :—**

१) भारतीय शासन आणि राजकारण — ले. रा. ज. लोटे, पिंपळापूरे अॅड कं. पब्लीशरर्स महाल नागपूर.

२) भारतीय राजकिय विचार — ले. रा. ज. लोटे , पहिली आवृत्ती जून २०१४.

३) भारताचे संविधान — डॉ. भीमराव रावजी आंबेडकर, राजरत्न बुक डेपो गणेश नगर वर्धा.

४) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह — भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन पुणे.

❑❑❑

**56**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक चळवळ — एक दृष्टीक्षेप

**प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे**
इतिहास विभाग प्रमुख,
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर
जि. पुणे

**********

- **प्रस्तावना :—**

'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' या वाक्यातून डॉ. बाबासाहेबांची शिक्षणाविषयीची ओढ दिसून येते. शिक्षण घेतल्याशिवाय माणूस बदलू शकत नाही व माणूस बदलाशिवाय परिवर्तन होत नाही, म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला 'वाघीणीचे दूध' असे म्हटले आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे मोठे शस्त्र आहे. त्याशिवाय माणसाला मोठेपण मिळत नाही. सुशिक्षित झाल्याशिवाय त्याला न्याय — अन्यायाची चाड येत नाही, कारण भारतात नेहमीच सुशिक्षितांनी अशिक्षितांचा फायदा घेतला आहे. म्हणूनच विकासाची गुरूकिल्ली शिक्षण हीच आहे. शिक्षणाशिवाय स्वावलंबन, परिवर्तन, स्वाभिमान, आत्मप्रतिष्ठा जागृती निर्माण होत नाही. भारतात जे महापुरूष जन्माला आले त्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला अग्रक्रम दिलेला दिसतो. त्यांनी खडतर तपश्चर्या करून शैक्षणिक चळवळ गतिमान केली. त्यांच्या शैक्षणिक चळवळीतून आज जो बदल दिसतोय त्यांचे खरे श्रेय या महामानवला जाते. त्यांनी सातारा, मुंबई, अमेरीका, इंग्लड, हैद्राबाद इ. ठिकाणी अहोरात्र अभ्यास करून शिक्षणाचा यज्ञ पूर्ण केला. त्यातून त्यांच्या विचारांची बैठक पूर्ण झाली. त्यामुळेच त्यांनी लोकांना शिक्षणाचा संदेश दिला व शैक्षणिक चळचळीत स्वत:ला झोकून दिले. त्यांची ही चळवळ लोकांना प्रगतीच्या दिशेने नेणारी ठरली.

- **अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासाचे प्रयत्न :—**

प्राचीन काळापासून अस्पृश्यांना कोणतेही

राजकीय, सामाजिक व शैक्षणिक अधिकार नव्हते त्यामुळे तो समाज शिक्षणत मागासलेला होता. अस्पृश्यांच्या मागासलेपणाच्या संदर्भात ब्रिटीश सरकारच्या १८८१–८२ च्या शिक्षण आयोगाचा तपशिल विचारात घेणे आवश्यक वाटते. प्राचीन काळातील शिक्षणचा फायदा तत्कालीन उच्चवर्णीय शिक्षितांना झाला. इ.स.पूर्व ३०० च्या सुमारास उच्चवर्णीय समाजात तत्वज्ञान व अर्थशास्त्र विषयांना महत्व होते. ब्राम्हणांना समाजात उच्च स्थान होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, प्राचीन काळापासून अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता. प्राचीन वैदिक अभ्यासांचे व्दार शुद्रांना उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक जीवन अंधकारमय होते. सम्राट अशोकाच्याही काळात अस्पृश्य मुलांना खालच्या दर्जाची वागणूक देण्यात येत असे. भारतीय राज्यकर्त्यांनी ब्राम्हण पुरोहितांपुढे शरणागती पत्करली होती. व त्यांच्या सल्ल्यानुसारच समाजरचनेची प्राचीन परंपरा टिकवून ठेवण्यात धन्यता मानली. मध्ययुगीन काळातही अश्पृश्य मुलांना उच्चवर्णीय मुलांशेजारी बसून शिक्षण घेणे अशक्य होत होते. त्यामुळे आधुनिक काळात डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य, दीनदलीत, मागास, वंचित घटकांच्या शिक्षणासाठी विविध प्रयत्न सुरू केले. त्यासाठीच मोठी शैक्षणिक चळवळ डॉ. आंबेडकरांनी उभारून वंचितांना शिक्षणची दारे खुली केली.

- **एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभाची शैक्षणिक स्थिती :—**

महाराष्ट्रात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरूझाल्यावर तत्कालीन मुंबई प्रांताचा गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टनने शिक्षण विषयक माहिती गोळा केली व ती सर्व कलेक्टरांनी पाठविली. त्यावरून तत्कालीन मुंबई प्रांतातील शैक्षणिक स्थितीची माहिती उपलब्ध होते. इ.स. १८१५ मध्ये स्थापना झालेल्या बॉम्ब एज्युकेशन सोसायटीने मुंबई प्रांतात शैक्षणिक कार्याला सर्वप्रथम सुरूवात केली. पुढे १८२७ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचे बॉम्बे नेटेव्ह एज्युकेशन सोसायटी असे नाव बदलण्यात आले. गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टन हेच या सोसायटीचे अध्यक्ष होते.

- **शिक्षण — परिवर्तनाचे मुख्य साधन :—**

शिक्षणामुळे परिवर्तन होते, हे आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र होते. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन नाही. कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनांचे साधन आहे, यावर त्यांची गाढ श्रध्दा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची गरज असल्याची जाणीवही त्यांना होती. 'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या ते करतात. गुलामाला त्यांच्या गुलामीचे गुपित सांगताना ते म्हणतात की, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन तो अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास तो जीवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम होतो. शिक्षणाअभावी माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभीमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्व आहे.' त्यांच्या या शिक्षणविषयक विचारांनी मागासलेल्या वर्गातही शैक्षणिक चळवळीचा प्रसार झाला.

- **प्राथमिक शिक्षणतील कार्य :—**

डॉ. आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणावर विशेष भर दिलेला दिसतो. त्यांच्या मते प्राथमिक शिक्षणाचा प्रचार हा राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. कारण तो राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. त्यासाठी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली पाहिजे. जे वर्ग आधीच शिक्षणचा लाभ घेतात, त्यांच्यावर शिक्षणासाठी सक्ती करावी लागत नाही, ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही व ते ज्या बाबतीत उदासीन असतात, त्यांच्याकरीताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते, म्हणून या देशात शिक्षणात मागासलेले जे वर्ग आहेत, त्यांच्या जिव्हाळाचा हा प्रश्न आहे. त्यासाठीच डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक चळवळ उभारून मागासलेल्या, दीनदुबळया, पिडीत लोकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले.

- **उच्च शिक्षणतील योगदान :—**

उच्च शिक्षणाचे मानवी आयुष्यात अत्यंत महत्व आहे, हे डॉ. आंबेडकरांनीमिलिंद महाविद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी केलेल्या भाषणातून पटवून दिलेले आहे. ते म्हणतात, 'अगदी खालच्या थरातून आल्यामुळे

शिक्षणाचे किती महत्व आहे हे मी जाणतोखालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगण्यात येते, पण ही मोठी चूक आहे. दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्चवर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांची मुले प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, त्यांच्या जीवनाचे स्वतःच्या दृष्टीने काय महत्व आहे, यांची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे व तो उच्च शिक्षणामुळेच साध्य होईल.

• **शिक्षणसंस्था व वसतिगृहांची स्थापना :—**

माणूस केंद्रबिंदू मानून, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर शिक्षणासारखे प्रभावी साधन नाही हे जाणून डॉ. आंबेडकरांनी १९४७ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. १९४६ मध्ये मुंबई येथे सिध्दार्थ कॉलेज सुरू केले, पुढे १९४९ मध्ये मिलिंद कॉलेज सुरू केले. त्या प्रसंगी ते म्हणतात, 'आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर शिक्षण हेच एक औषध आहे, म्हणून दलितांच्या शिक्षण प्रसारासाठी काहीतरी करावे हे माझे लहानपणापासूनचे स्वप्न होते, ते मी मिलिंद कॉलेजच्या रूपाने सत्यात आणू शकले याचा मला आनंद होत आहे.' पुढे महाड, पंढरपूर, नांदेड इ. ठिकाणी शाखा सुरू केल्या.

• **लोकशाही विकासासाठी शिक्षण :—**

लोकशाहीच्या संर्वधनासाठी राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे अत्यंत महत्व आहे. डॉ. आंबेडकर या संदर्भात म्हणतात, 'लोकशाही यशस्वी करायची असेलतर जनता, समाज हा नैतिक मूल्याधिष्ठीत शिक्षणाव्दारे संस्कारीत असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्याधिष्ठीत समाजाची लोकशाही ही हमखास यशस्वी ठरू शकेल.' त्यांच्या मते शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र होय. ते एक राष्ट्रीयतेचे, मानवतेचे व अज्ञान दूर करण्याचे उदात्त कार्य आहे. समाज मने सुसंस्कृत करण्यासाठी, मानवतेचे संरक्षण करण्यासाठी शिक्षणाचे विशेष महत्व आहे. शिक्षणाचे पावित्र्य व समाजाचे भवितव्य विद्यार्थ्यांच्याच हातात आहे. शिक्षणाबरोबर शिलाची व सदाचरणाची आवश्यकता असल्याचे त्यांचे स्पष्ट मत होते.

• **बहिष्कृत हितकारिणी सभा व शिक्षणातील योगदान :—**

समाजातील प्रत्येक घटक शिक्षणाच्या मुलप्रवाहात आला पाहिजे यासाठी त्यांनी तशा उपाययोजनाही आाखल्या होत्या. तळागाळातील समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने १९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या सभेमार्फत १९२५ मध्ये दलित विद्यार्थ्यासाठी सोलापूर येथे वसतीगृह सुरू केले वसतिगृहे, वाचनालये, समाजकेंद्र व अभ्यासमंडळे उघडून दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार केला. औद्योगिक व कृषीशाळा सुरू करून दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. समाजातील वंचित घटकापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे कार्य त्यांनी साधले.

• **समारोप :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाचे कार्य समाजातील वंचित, मागास घटकांसाठी होते. त्या शिक्षणाने समाजपरिवर्तन व्हावे हा त्यांचा दृष्टीकोन होता. व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण होय अशी त्यांनी केलेली शिक्षणाची व्याख्या खरोखरच त्यांनी प्रत्यक्षात आणली. व्यक्तीला त्यांच्या गुलामगिरीची, दारिद्रियाची व विवंचनेची जाणीव केवळ शिक्षणाने प्राप्त होते. म्हणूनच 'शिका, संघटित व्हा संघर्ष करा' असा त्यांनी जनतेला नारा दिला. शिक्षणामुळे समाजसुधारणा घडून येईल यावर त्यांचा विश्वास होता. त्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे व ते सक्तीचे करावे असा सल्ला डॉ. आंबेडकरांनी दिला होता. पिंपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मुंबई, औरंगाबाद, महाड, पंढरपूर, नाशिक, नांदेड अशा अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे स्थापन केली. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातूनही आधी काही वसतीगृहे स्थापन करून त्याव्दारे शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रभावी कार्य केले. त्यांनी आपल्या शैक्षणिक चळवळीतून भारतातील बहुजन व वंचित समाजाला शिक्षणरूपी वटवृक्ष उभारून दिला. शिक्षणाला प्राधान्य

देऊन त्यांनी वंचित दलित, अस्पृश्य, बहुजन या सर्वांच्या मनात शिक्षणाविषयी गोडी निर्माण केली. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या शैक्षणिक चळवळीला पुढे नेण्यासाठी सरकारने अजून प्रयत्न केले पाहिजे, की ज्यामुळे वंचित घटकांना परिपूर्ण न्यायमिळू शकेल, तळागाळातील व अतिमागासलेला समाज अद्यापही शिक्षणापासून वंचित आहे. त्यांनाही भविष्यात शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता येईल.

• संदर्भ :—


१) निकुंभे सी. एच., समाजप्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५

२) जखोटिया गिरीष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व २१ वे शतक, मॅजेस्टिक प्रकाशन, ठाणे, २०१५

३) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१४

४) सावंत उत्तम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१३

५) सुरवाडे विजय, समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाड्‌मय प्रकाशन, मुंबई २०१४


❑❑❑

57

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयी भुमिका


**डॉ. प्रज्ञा भिमराव गुरदे (जमधाडे)**

सहायक प्राध्यापक,

डी.एम.एम. आयुर्वेद कॉलेज, यवतमाळ


**********

संपूर्ण निसर्गामध्ये सजीव प्राण्यात केवळ मानव प्राणी हा असा आहे ज्याच्यामध्ये विवेक बुद्धी, भावभावना, विचार—विनिमय, संकल्प—विकल्प इत्यादी गोष्टी आढळून येतात. त्याच्या ठिकाणी सद्सद्विवेकबुध्दी आहे. त्यामुळे तो चांगले काय आणि वाईट काय हे ठरवू शकतो. त्याच्याठिकाणी विचार स्वातंत्र्य आहे. निर्णय क्षमता आहे. म्हणूनच आज तो सर्व निसर्गावसर अधिपत्य गाजवितांना दिसून येतो. हे जरी सत्य असले तरी आपणास असे दिसून येते की, निसर्गाच्या पाठीवर सर्वत्र मनुष्यप्राणी हा जरी रंग, रूप इत्यादीने भिन्न दिसत असला तरी शारीरिकदृष्टया म्हणजे शरीररचनेच्या दृष्टीने तो सर्वत्र सारखाच आहे. रक्त, मांस, पेशी इत्यादीच्या बाबतीत समान असणारा माणूस जेव्हा माणसामाणसांत भेद करायला लागतो. श्रेष्ठ कनिष्ठता मानायला लागतो, उच्च—नीच असा भेद करायला लागतो तसेच एक माणूस दुसऱ्या माणसाला स्पर्श करणेसुध्दा टाळायला लागतो किंवा एका माणसाच्या सावलीचा विटाळ दुसऱ्या माणसाला व्हायला लागतो तेव्हा प्रश्न निर्माण होतो की, मनुष्य हा खरोखरी विवेकबुध्दी असणारा प्राणी आहे काय ? की माणसाने केवळ स्वतःच्या स्वार्थापोटी माणसामाणसांत भेदभाव निर्माण केला आहे ? अर्थातच याचे उत्तर सोपे आहे की, मनुष्याने केवळ स्वार्थापोटी विषमतेचे बीज पेरले आहे. माणसाची मानसाप्रती असणारी विषमता ही अतिशय विषारी अशी आहे. विषमतेचे विष हे त्याच्या अंगी भिनलेले आहे. त्याने विषारी प्राण्यांनाही लाजवेल असा विषारीपणा आपल्या अंगी बानला आहे आणि